जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ११२ दिनांक -१५/०२/२०२५**

युनिट १ गुन्हे शाखा पुणे शहर

## बॅटरी चोरी करणा-या इसमास अटक युनिट-१,गुन्हे शाखेची कामगिरी

दि.०३/०२/२०२५ रोजी सायं. ०७/०० वा. ते. दि.०४/०२/२०२५ रोजी आशिर्वादम अपार्टमेंट,साठे कॉलनी,शुक्रवार पेठ पुणे या बिल्डिंग मध्ये फिर्यादी यांचे कार्यालय असुन त्याचे पार्किंगमध्ये लाईट बॅकअप साठी ठेवलेल्या ०८ बॅट-या लोखंडी रॅक मध्ये लॉक करुन ठेवलेल्या असताना कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीने चोरुन नेल्या होत्या सदर बाबत फिर्यादी यांनी फिर्याद दिल्याने खडक पोलीस ठाणे,गु.र.नं. ८२/२०२५ बी.एन.एस.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हयाचा समांतर तपास युनिट १ गुन्हे शाखा करीत असताना दि.१३/०२/२०२५ रोजी युनिट १ कडील सपोनि कृष्णा बाबर पोलीस अंमलदार सपोफौज मखरे,पो.हवा.बाबर, जाधव,दरेकर, सोनवणे,असे प्राप्त झालेल्या सीसीटीव्ही फुटेजचे आधाराने आरोपींनी गुन्हा करताना वापरलेली रिक्षाचा शोध घेत असताना **पोलीस अंमलदार दत्ता सोनवणे** यांना बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की,सदरची रिक्षा ही हिंगणे सिंहगड रोड पुणे येथील राजीव गांधी वसाहत मधील इसम नामे सुरज याची असुन ती आत्ता राजीव गांधी वसाहत येथे लागलेली आहे.अशी बातमी प्राप्त झाले नंतर सदरची बातमी वरिष्ठांना कळवुन वर नमुद स्टाफ असे सदर ठिकाणी गेले असता सदर ठिकाणी जाताच समोरुन एक इसम चालत येत असल्याचे दिसले.बातमीदाराने सांगितलेल्या वर्णना प्रमाणे पोलीस स्टाफला त्याचा संशय आल्याने त्यास नमुद स्टाफचे मदतीने पकडुन प्रथम त्यास ओळख सांगुन त्यास त्याचे नाव व पत्ता विचारता त्याने आपले नाव **सुरज नामदेव साठे वय ३२ वर्षे रा.दांडेकर पुल पुणे सध्या रा. राजीवगांधी वसाहत,हिंगणे खुर्द सिंहगड रोड,पुणे** असे असल्याचे सांगितले.त्यानंतर त्याचेकडे दाखल गुन्हयाचे अनुषंगाने तपास केला सदर इसमाने गुन्हा हा त्याचे साथीदार नामे सुरेखा मनिष केंदळे व त्याची पत्नी नामे वैशाली सुरज साठे यांचे मदतीने केला असल्याचे सांगितले व कबुल केले.

सदर आरोपी कडुन गुन्हयातील चोरीस गेलेल्या एकुण किं.रु.१,२०,०००/- च्या ८ ॲमरॉन कंपनीच्या बॅट-या व किं.रु.२०,०००/- ची गुन्हा करताना वापरलेली रिक्षा असा एकुण १,४०,०००/- चा माल जप्त करण्यात आलेला असुन सदर गुन्हा उघडकीस आणण्यात आला आहे.

सदरची कामगिरी सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,श्री.शैलेश बलकवडे,मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री.निखील पिंगळे, मा.सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे १,श्री.गणेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट-१ कडील वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.शब्बीर सय्यद, सहा.पोलीस निरीक्षक कृष्णा बाबर,पोलीस अंमलदार राहुल मखरे,अनिकेत बाबर,दत्ता सोनवणे,शशिकांत दरेकर,निलेश जाधव,महेश बामगुडे,अभिनव लडकत,महिला अंमलदार मयुरी जाधव यांनी केली.